


भाताची जळती शेतं..!

सारा कोन ब्रायंट
चित्रं : मामोरु फुनाई




भाताची जळती शेतं..!

सारा कोन ब्रायंट
चित्रं : मामोरु फुनाई



कोणे एके काळी, जपानमध्ये एक म्हातारा आणि त्याचा नातू यांनी पर्वतावरच्या एका सुपीक आणि सपाट जमिनीवर तांदुळाची रोपं लावली होती. तांदुळ मात्र पर्वताच्या तळाशी समुद्राशेजारी रहाणा-या कोळ्यांच्या मालकीचा होता.



समुद्र त्या गावाच्या खूप जवळ होता, त्यामुळे पर्वताच्या तळाशी गावक-यांना घरं बांधल्याशिवाय दुसरा पर्यायच नव्हता; त्यामुळे कोळ्यांनी तांदुळ पर्वतरांगांच्या जरा वर पेरायला सांगून तो म्हातारा आणि त्याचा नातू यांना त्या मौल्यवान भातशेतीची निगा राखायचं काम दिलं होतं.



एक दिवस तो म्हातारा समुद्राकडे पहात असताना, त्याला एक भीतीदायक गोष्ट दिसली. त्यानं डोळ्यांवर हात धरुन परत एकदा तिकडे पाहिलं. मग तो ओरडून आपल्या नातवाला म्हणाला, “पळ, पळत पळत घराकडे जा आणि एक जळतं लाकूड घेऊन ये!”





आपल्या आजोबांना इतकं मोठ्या आवाजात बोलताना त्या मुलानं कधीच ऐकलं नव्हतं, त्यामुळे तोही खूप घाबरला. तरीही, तो पळत घराकडे निघाला; त्यानं चुलीतलं एक जळतं लाकूड बाहेर काढलं आणि आजोबांना नेऊन दिलं. आजोबांनी तात्काळ ते जळतं लाकूड घेतलं आणि कापणीला आलेल्या तांदुळाच्या शेतात आग लावली.






काही क्षणांमध्येच तांदुळाच्या शेतानं पेट घेतला. आगीच्या ज्वाळा लपलपत पिकाचा घास घेत होत्या आणि पर्वताच्या बाजूंना त्यातून उठलेल्या भयानक धुरानं लपेटलं होतं.

“आजोबा, आजोबा,” तो लहान मुलगा स्फुंदत म्हणाला. “हे काय करताय तुम्ही? थांबा ना.. थांबा जरा..!”



गावक-यांनी ते पाहिलं, तेव्हा त्यांना त्यांच्या मौल्यवान भातशेतीला आग लागलेली दिसली. ते एकदम वेगानं धावत सुटले. स्त्रिया, पुरुष आणि लहान मुलं असे सगळे पर्वतावर आग विझवण्यासाठी जमा झाले. गावात एकही माणूस मागे राहिला नाही.



आणि ते जेव्हा पर्वतावरच्या शेतात पोचले आणि भातशेतीला आग लागलेली दिसली, तेव्हा ते रडायला ओरडायलाच लागले. “असं कसं झालं? असं कसं झालं?” असा आक्रोश करु लागले.


"मी आग लावली". तो म्हातारा गंभीर स्वरात म्हणाला.

"होय". तो लहान मुलगा म्हणाला. "आजोबांनी आग लावली."

हे ऐकून गावक-यांना खूपच राग आला. म्हाता-याभोवती कोंडाळं करुन ते त्याला "का? का?" असं विचारायला लागले.

म्हातारा शांत होता. "ते पहा.." तो समुद्राकडे बोट दाखवून म्हणाला.







गावक-यांनी वळून पाहिलं. तिथे काही वेळापूर्वी समुद्रात सुस्तावलेल्या लाटा होत्या, तिथे आता पाण्याची एक मोठी भिंत तयार झाली होती.

ते भयंकर दृश्य पाहून कुणाच्याच तोंडून शब्द फुटेना.

त्सुनामीचं ते पाणी गावात शिरलं, घरं त्या पाण्यानं उचलून अक्षरशः हवेत फेकली.

पर्वतांवर लाटांमागून लाटा आदळत राहिल्या. मग सगळं संपलं. सगळं शांत झालं. गाव समुद्राखाली गडप झालं होतं.





जेव्हा त्या म्हाता-यानं काय केलं ते लोकांच्या लक्षात आलं, तेव्हा त्यांना त्याच्याबद्दल खूपच आदर वाटला आणि त्यांनी त्याचा सत्कार केला.

